असा. क्र. १ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९ 1.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जानेवारी ६, १९९९/पौष १६, शके १९२०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १---महाराष्ट्र राज्यामधील शैक्षणिक, व्यावसायिक आणि इतर विवक्षित परीक्षांशी संबंधित विवक्षित बाबींचे विनियमन करण्याकरिता राज्य परिषदेची स्थापना करण्याची आणि त्याच्याशी संबंधित इतर बाबींची किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम. .. .. | १--१७ |

दिनांक २ जानेवारी १९९९ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रतिमा उमरजी,

सचिव,

विधी व न्याय विभाग.

### सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ६ जानेवारी १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**महाराष्ट्र राज्यामधील शैक्षणिक, व्यावसायिक आणि इतर विवक्षित परीक्षांशी संबंधित विवक्षित बाबींचे विनियमन करण्याकरिता राज्य परिषदेची स्थापना करण्याची आणि त्याच्याशी संबंधित इतर बाबींची किंवा तदनुषंगिक बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यामधील शैक्षणिक, व्यावसायिक आणि इतर विवक्षित परीक्षांशी संबंधित बाबींचे विनियमन करण्याकरिता राज्य परिषदेची स्थापना करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित इतर बाबींसाठी आणि तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणपन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

#### प्रकरण एक

#### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अधिनियम, १९९८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) ती राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकाला अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(अ) "संलग्न संस्था" म्हणजे, परिषदेने यथोचितरीत्या मान्यता दिलेली आणि तिच्याशी संलग्न केलेली संस्था;

(ब) "आयुक्त" म्हणजे, कलम २० अन्वये नेमलेला महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा आयुक्त;

(क) "परिषद" म्हणजे, कलम ३ अन्वये स्थापन झालेली राज्य परीक्षा परिषद किंवा यथास्थिति प्रादेशिक परिषदा;

(ड) "उपविधी" म्हणजे, कलम ३९ अन्वये राज्य परिषदेने तयार केलेले उपविधी;

(ई) "परीक्षा" म्हणजे, परिषदेने पाठ्यविषयासंबंधात घोषित केलेल्या प्रत्येक विहित अवधीच्या अखेरीस परिषदेकडून घेतली जाणारी एक किंवा अधिक परीक्षा;

(फ) "शासन" म्हणजे, महाराष्ट्र शासन;

(ग) "विहित" म्हणजे, विनियमांद्वारे विहित केलेले;

(ह) "प्राचार्य किंवा मुख्याध्यापक" म्हणजे, मान्यताप्राप्त संस्थेच्या कर्मचारीवर्गाचा प्रमुख;

(आय) "व्यावसायिक परीक्षा" म्हणजे, उमेदवाराने ज्या कोणत्याही व्यवसाय पाठ्यक्रमासाठी अर्ज केलेला असेल त्यात प्रवेशासाठी पात्र होण्याकरिता त्याच्या ज्ञानाचा आणि गुणवत्तेचा स्तर मोजण्यासाठी परिषदेकडून घेतली जाणारी परीक्षा;

(ज) "विभागीय परिषद" म्हणजे, कलम ३, पोट-कलम (२) अन्वये शासनाने स्थापन केलेली प्रादेशिक परिषद;

(के) "मान्यताप्राप्त संस्था" म्हणजे, शासनाच्या/शालेय शिक्षण विभागाने रीतसर मान्यता दिलेल्या, विहित पाठ्यविषयांनुसार शिक्षण किंवा प्रशिक्षण देणारा संघटित निकाय;

(ल) "विनियम" म्हणजे, कलम ३८ अन्वये शासनाने आणि कलम ३७ अन्वये राज्य परिषदेने तयार केलेले विनियम;

(म) "शैक्षणिक परीक्षा" म्हणजे, प्राथमिक व माध्यमिक शालेय स्तरावर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नैपुण्याचा दर्जा मोजण्यासाठी परिषदेकडून घेतली जाणारी परीक्षा;

(न) "राज्य परिषद" म्हणजे, या अधिनियमाच्या कलम ३, पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेली महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद.

## प्रकरण दोन

### परिषदेची स्थापना आणि रचना

राज्य आणि प्रादेशिक परिषदांची स्थापना. ३. (१) शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, संपूर्ण राज्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद नावाची एक परिषद स्थापन करील.

(२) त्याचप्रमाणे राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्रदेशासाठी किंवा सर्व प्रदेशांसाठी व अशा नावाने प्रादेशिक परिषद स्थापन करू शकेल.

परिषद कायद्याने व संस्थापित करणे. ४. कलम ३, पोट-कलम (१) अन्वये स्थापन करण्यात आलेली राज्य परिषद ही अखंड परंपरा व सामाईक शिक्का असलेली एक निगम निकाय असेल आणि तिला, करार करण्याचा, जंगम व स्थावर दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व ती निकालात काढण्याचा आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि तिच्या निगम नावाने तिला दावा करता येईल व तिच्यावर दावा लावता येईल.

५. (१) राज्य परिषदेमध्ये महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट अ (प्रशासन शाखा) मधून राज्य आणि शिक्षण संचालकाच्या श्रेणीतील शासनाने नियुक्त केलेला एक अध्यक्ष आणि पुढील सदस्य असतील :— विभागीय परिषदांची रचना.

### पदसिद्ध सदस्य

(एक) शासनाचा शिक्षण संचालक किंवा त्याने नामनिर्देशित केलेली, सह-संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती;

(दोन) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ किंवा त्याने नामनिर्देशित केलेली विभागीय अध्यक्षाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती;

(तीन) संचालक, राज्य शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद किंवा त्याने नामनिर्देशित केलेली सह-संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेली व्यक्ती;

(चार) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन संस्था, पुणे ;

(पाच) प्राचार्य, महाराष्ट्र राज्य व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई;

(सहा) संचालक, राज्य विज्ञान शिक्षण संस्था;

(सात) शासनाने नाम निर्देशित केलेला शालेय शिक्षण विभागांतील उप सचिवाच्या दर्जा पेक्षा कमी नसलेला अधिकारी ;

(आठ) सर्व विभागीय परिषदांचे अध्यक्ष.

### नामनिर्देशित सदस्य

(एक) शासनाने नामनिर्देशित केलेला एक विभागीय शिक्षण उप संचालक ;

(दोन) शासनाने नामनिर्देशित केलेला एक शिक्षण अधिकारी (माध्यमिक) किंवा शिक्षण निरीक्षक;

(तीन) शासनाने नामनिर्देशित केलेला एक शिक्षण अधिकारी (प्राथमिक);

(चार) प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अध्यापक विद्यालय व वाणिज्य शिक्षण संस्था यांचे प्राचार्य किंवा मुख्याध्यापक यांच्यामधून प्रत्येकी एक याप्रमाणे शासनाने नामनिर्देशित केलेले पाच सदस्य;

(पाच) शिक्षण, शैक्षणिक मूल्यमापन, मार्गदर्शन व निवड या क्षेत्रातील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव असणारे, शासनाने नामनिर्देशित केलेले तीन सदस्य; आणि

(सहा) प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालय व वाणिज्य शिक्षण संस्था यांच्या व्यवस्थापन मंडळांमधून प्रत्येकी एक याप्रमाणे शासनाने नामनिर्देशित केलेले चार सदस्य;

(२) आयुक्त हा राज्य परिषदेचा पदसिद्ध सदस्य-सचिव असेल जो राज्य परिषदेच्या बैठकीच्या विचारविमर्शात आणि कामकाजात भाग घेण्यास हक्कदार असेल; परंतु, त्याला मत देण्याचा अधिकार नसेल;

(३) (अ) विभागीय परिषदेमध्ये महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ (प्रशासन शाखा) मधून शिक्षण उपसंचालक श्रेणीतील राज्य शासनाने नियुक्त केलेला एक विभागीय अध्यक्ष आणि पुढील सदस्य असतील :—

### पदसिद्ध सदस्य

(एक) त्या प्रदेशातील सर्व विभागीय उप संचालक;

(दोन) त्या प्रदेशाच्या अधिकारितेत सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांमधून राज्य शासनाने पदनिर्देशित केलेले तीन शिक्षण अधिकारी किंवा शिक्षण निरीक्षक.

### नामनिर्देशित सदस्य

(एक) माध्यमिक शाळा, प्राथमिक शाळा, अध्यापक विद्यालय, वाणिज्य शिक्षण संस्था आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांच्या प्राचार्यांमधून शासनाने नामनिर्देशित केलेले प्रत्येकी एक प्रमाणे पाच सदस्य;

(दोन) वर क्रमांक १ मध्ये उल्लेख केलेल्या प्रवर्गातील संस्थांच्या शिक्षकांमधून शासनाने नामनिर्देशित केलेले चार सदस्य ;

(तीन) शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनामधून दोन सदस्य.

(चार) परिषदेच्या कार्यक्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींमधून किंवा निवृत्त व्यक्तींमधून दोन सदस्य.

(ब) विभागीय परिषदेच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला सहाय्यक आयुक्त हा विभागीय परिषदेचा पदसिद्ध सदस्य-सचिव असेल जो विभागीय परिषदेच्या बैठकीच्या विचारविमर्श व कामकाजात भाग घेण्यास हक्कदार असेल, परंतु त्याला मत देण्याचा अधिकार नसेल. परंतु, एखादी व्यक्ती, ज्या आधारे तिची, राज्य परिषदेचा किंवा यथास्थिति प्रादेशिक परिषदेचा सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली असेल ते पद, पदनाम किंवा अधिकार पद धारण करण्याचे बंद करील किंवा यथास्थिति, ती व्यवस्थापन मंडळाचा प्रतिनिधी असण्याचे बंद होईल तर ती राज्य परिषदेचा किंवा यथास्थिति प्रादेशिक परिषदेचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल आणि अशी व्यक्ती ती परिषदेचा सदस्य असल्याचे बंद झाल्यापासून एका आठवड्याच्या आत परिषदेच्या अध्यक्षाला तसे स्वतःच्या सहीनिशी लेखी कळवील.

(४) राज्य परिषदेचे किंवा यथास्थिति विभागीय परिषदेचे सदस्य म्हणून वेळोवेळी नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या (पदसिद्ध सदस्य नसलेल्या) व्यक्तींची नावे शासन राजपत्रात प्रसिद्ध करील.

परिषदांच्या अध्यक्षांचा पदावधी व सेवेच्या शर्ती.

६. (१) राज्य परिषदेचा अध्यक्ष आणि विभागीय परिषदेचा अध्यक्ष हे नेमणुका झाल्याच्या दिनांकापासुन चार वर्षांच्या कालावधीकरिता पद धारण करतील.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, लोकसेवेची निकड लक्षात घेऊन अशा अवधीत शासनाच्या अधीन इतर कोणत्याही पदावर अध्यक्षाची बदली करण्याच्या शासनाच्या अधिकारास बाध येणार नाही; आणि अध्यक्ष शासनाच्या सेवेतून वयनिवृत्त झाला तर तो अध्यक्ष असल्याचे बंद होईल; मात्र त्याची सेवा वाढविण्यात आली किंवा त्याची शासनाच्या सेवेत फेरनेमणूक करण्यात आली आणि त्याची इतर एखाद्या पदावर बदली करण्यात आली नाही तर गोष्ट वेगळी.

(३) शासनाला राज्य परिषदेच्या किंवा विभागीय परिषदेच्या अध्यक्षाचा पदावधी वेळोवेळी वाढवता येईल. तथापि, असा एकूण अवधी आठ वर्षांहून अधिक असणार नाही.

(४) राज्य परिषदेचा अध्यक्ष आणि विभागीय परिषदांचा अध्यक्ष हे शासनाचे महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट अ मधील कर्मचारी असतील आणि अध्यक्ष त्यांची वेतने व भत्ते राज्याच्या एकत्रित निधीमधून घेतील. अध्यक्षाचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती या शासन निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

(५) अध्यक्षाचे पद रजेमुळे, आजारीपणामुळे किंवा इतर कारणामुळे तात्पुरते रिक्त होईल त्या कालावधीत आयुक्त, अध्यक्षाचे प्रशासनिक अधिकार पार पाडील आणि विभागीय परिषदेच्या अध्यक्षाचे पद तात्पुरते रिक्त होईल त्या कालावधीत राज्यपरिषदेचे अध्यक्ष अशा प्रादेशिक परिषदेचा अध्यक्ष म्हणून अन्य व्यक्तीची नियुक्ती करू शकेल.

परिषदेच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते.

७. (१) परिषदेच्या पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्य हे ज्या दिनांकास त्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध होतील त्या दिनांकापासून चार वर्षांच्या अवधीसाठी पद धारण करतील.

(२) मावळत्या सदस्यांचा पदावधी हा, त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांची नावे ज्या दिनांकास राजपत्रात प्रसिद्ध होतील त्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या दिवसापर्यंत चालू राहील व त्या दिनांकास संपेल.

(३) विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील असे पूरक भत्ते शासकीय सदस्यांना आणि असे पारिश्रमिक अशासकीय सदस्यांना मिळण्याचा हक्क असेल.

८. एखादी व्यक्ती ही पुढील बाबतीत राज्य परिषदेचा किंवा कोणत्याही विभागीय परिषदेचा परिषदेचा किंवा या अधिनियमाखाली नेमण्यात आलेल्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून अध्यक्ष व नेमली जाण्यास, किंवा नामनिर्देशित केली जाण्यास किंवा असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून चालू सदस्य यांची राहण्यास निरर्ह ठरेल,— निरर्हता.

(अ) जर अशा व्यक्तीचा स्वतःचा किंवा तिच्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष-रीत्या,—

(एक) कोणत्याही प्रकाशित झालेल्या पाठ्यपुस्तकात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आता किंवा पूर्वी असेल तर,— किंवा

(दोन) परिषदेच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा तिच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर:

परंतु, ज्या व्यक्तीचा कोणत्याही पाठ्यपुस्तकामध्ये उप खंड (एक) मध्ये निर्देशिल्याप्रमाणे कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध होता ती व्यक्ती, जर अशा पुस्तकाच्या प्रकाशनाच्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी लोटलेला असेल तर, त्या उपखंडान्वये निरर्ह ठरल्याचे मानण्यात येणार नाही;

(ब) जर अशा व्यक्तीविरुद्ध कलम १५, पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये पदावरून काढून टाकण्याचा आदेश देण्यात आला असेल तर ;

स्पष्टीकरण.—खंड (अ) उप खंड (एक) च्या प्रयोजनार्थ,—

(अ) पाठ्यपुस्तकाच्या प्रकाशनामध्ये त्याचे फेरप्रकाशनही अंतर्भूत असेल;

(ब) अशा पुस्तकाच्या प्रकाशकाच्या व्यवसायामध्ये जर एखाद्या व्यक्तीचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर त्या कारणामुळे ती व्यक्ती निरर्ह ठरली असल्याचे मानण्यात येईल.

९. राज्य परिषदेच्या किंवा विभागीय परिषदेच्या किंवा कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा निरर्ह सदस्य याला लगत पूर्ववर्ती कलमामध्ये नमूद केलेल्या निरर्हतांपैकी कोणतीही निरर्हता लागू ठरवल्यामुळे झाली तर राज्य शासन अशा व्यक्तीचे पद रिक्त म्हणून घोषित करील. अध्यक्षांचे किंवा सदस्याचे पद रिक्त होणे.

१०. राज्य परिषदेवरील किंवा विभागीय परिषदेवरील नामनिर्देशित किंवा नियुक्त सदस्य, परवानगी-परिषदेच्या अध्यक्षांच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय परिषदेच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित शिवाय राहिला तर, त्याचे पद रिक्त होईल आणि ते तसे असल्याचे अध्यक्ष घोषित करील. अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याचे पद रिक्त होणे.

११. अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद कलम ९ किंवा १० अन्वये रिकामे झाले आहे किंवा कसे रिक्त पदा-याविषयी कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबतीत शासनाचा निर्णय अंतिम असेल. बाबतच्या प्रश्नाचा निर्णय.

१२. राज्य परिषदेच्या किंवा विभागीय परिषदेच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त अन्य सदस्यास सदस्याचा परिषदेच्या अध्यक्षाकडे लेखी राजीनामा देऊन कोणत्याही वेळी आपल्या पदाचा राजीनामा देता राजीनामा. येईल ; आणि असा राजीनामा अध्यक्षास मिळाल्याबरोबर अशा सदस्याने आपले पद रिक्त केले आहे असे मानण्यात येईल.

नैमित्तिक रिक्त पदे. १३. परिषदेच्या कोणत्याही समितीच्या सदस्यांची सर्व नैमित्तिक रिक्त पदे यथास्थिति, नामनिर्देशनाद्वारे किंवा नेमणुकीद्वारे शक्य तितक्या लवकर भरण्यात येतील; आणि त्या नैमित्तिक रिक्त पदावर नामनिर्देशन किंवा नेमणूक करण्यात आलेली व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी तिचे नामनिर्देशन किंवा नेमणूक झालेली असेल त्या सदस्याचे पद रिक्त झाले नसते तर त्याने जोपर्यंत ते पद धारण केले असते तोपर्यंत ते पद धारण करील.

रिक्त पदां-मुळे किंवा रचनेतील दोषांमुळे कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे. १४. राज्य परिषदेची किंवा कोणत्याही विभागीय परिषदेची किंवा परिषदेच्या कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ अशा परिषदेमध्ये किंवा समितीमध्ये कोणतेही रिक्त पद असल्यामुळे किंवा अशा परिषदेच्या किंवा समितीच्या रचनेमध्ये दोष असल्यामुळे विधिअग्राह्य ठरणार नाही.

सदस्यास काढून टाकणे. १५. (१) शासन राज्य परिषदेच्या किंवा यथास्थिति विभागीय परिषदेच्या शिफारशीवरून आणि त्यास आणखी कोणतेही चौकशी करणे योग्य वाटेल तर अशी चौकशी केल्यानुसार आदेशाद्वारे राज्य परिषदेच्या किंवा विभागीय परिषदेच्या किंवा त्यांच्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही सदस्यास पुढील कारणांवरून काढून टाकू शकेल :—

(अ) अशा सदस्यास नैतिक अध:पात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाने दोषी ठरविलेले असेल; किंवा

(ब) असा सदस्य असुक्त नादार असेल ; किंवा

(क) राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा वैद्यकीय प्राधिकरणाने अशा सदस्याला शारीरिकदृष्टचा विकलांग म्हणून घोषित केले असेल ; किंवा

(ड) असा सदस्य, विकल मनाचा असून सक्षम न्यायालयाने तो तसा असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(ई) असा सदस्य राज्य परिषदेच्या किंवा विभागीय परिषदेच्या ध्येयांना व उद्दिष्टांना हानिकारक अशा रीतीने वागत असेल :

परंतु, अशी शिफारस का करण्यात येऊ नये किंवा असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी त्याला देण्यात आलेली असल्याखेरीज, राज्य परिषद किंवा विभागीय परिषद अशी कोणतीही शिफारस करणार नाही किंवा खंड (ई) अन्वये कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) राज्य शासन राज्य परिषदेच्या किंवा तिच्या समितीच्या कोणत्याही नेमलेल्या किंवा नामनिर्देशित केलेल्या सदस्यास, किंवा शासनाच्या मते ज्याच्या कृति राज्य परिषदेचे किंवा विभागीय परिषदेचे अथवा तिच्या कोणत्याही समितीचे कार्य योग्य रीतीने चालण्यास हानिकारक असतील किंवा त्यात अडथळा आणत असतील त्या सदस्यास, आदेशाद्वारे, स्वत: होऊन काढून टाकू शकेल :

परंतु, कोणत्याही सदस्याला त्याच्याविरुद्ध असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आलेली असल्याखेरीज त्याला पदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(३) पोट-कलमे (१) व (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य परिषदेच्या आणि विभागीय परिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांस, शासनाची मर्जी असेतोपर्यंत पद धारण करता येईल आणि त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यास पदावरून काढून टाकता येईल.

परिषदेची बैठक.

१६. (१) राज्य परिषदेच्या आणि प्रत्येक विभागीय परिषदेच्या वर्षातून किमान दोन बैठकी होतील आणि लागोपाठच्या दोन बैठकींच्या दरम्यान सहा महिन्यांचे अंतर पडणार नाही.

(२) राज्य परिषदेच्या किंवा विभागीय परिषदेच्या अध्यक्षास, निकडीच्या कारणामुळे तशी आवश्यकता असल्यास किंवा परिषदेच्या एकूण सदस्यांपैकी (पदसिद्ध सदस्य वगळता) एक-तृतियांशाहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केली असता, त्याला अशी विनंती मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांपेक्षा नंतरचा नसेल अशा दिनांकास परिषदेची विशेष बैठक बोलावता येईल.

तज्ज्ञांना आणि अधिकाऱ्यांना बैठकीस बोलाविण्याचा अधिकार.

१७. परिषदेचा अध्यक्ष त्याच्या मते शिक्षण क्षेत्रातील तज्ञ असलेल्या व्यक्तीचा किंवा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा, ज्या विषयाशी संबंध असेल तो विषय जर परिषदेच्या किंवा तिच्या समितीच्या चर्चेसाठी येण्याचा किंवा विचारार्थ मांडला जाण्याचा संभव असेल तर, त्या तज्ञाला किंवा अधिकाऱ्याला अशा बैठकीकरिता निमंत्रित करू शकेल.

समित्यांची रचना.

१८. (१) राज्य परिषद, पुढील समित्या नियुक्त करील :—

(अ) विद्या समिती ;
(ब) कार्यकारी समिती ;
(क) वित्त समिती ;
(ड) परीक्षा समिती.

(२) राज्य परिषदेला, तिची कार्ये कार्यक्षम रीत्या पार पाडण्याकरिता तिला आवश्यक वाटतील अशा इतर समित्यांची रचना करता येईल.

(३) प्रत्येक विभागीय परिषद, पुढे पदनिर्देशित केल्याप्रमाणे समित्या नियुक्त करील :—

(अ) स्थायी समिती,
(ब) परीक्षा समिती.

(४) विभागीय परिषदेला, तिची कार्ये कार्यक्षम रीत्या पार पाडण्याकरिता विहित करण्यात येतील अशा इतर समित्या नेमता येतील.

(५) परिषदेने नियुक्त केलेल्या प्रत्येक समितीची रचना, तिच्या सदस्यांचा पदावधी व समितीने पार पाडावयाची कर्तव्ये व कामे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

राज्य परिषदेने विवक्षित कर्मचारीवर्ग सामावून घेणे व हा अधिनियम लागू असेल अशा गोष्टीं-संबंधीची शासनाची दायित्वे स्वीकारणे.

१९. (१) राज्य परिषदेच्या स्थापनेच्या दिनांकास, महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाच्या (यापुढे या अधिनियमात ज्याचा उल्लेख "मंडळ" असा करण्यात आला आहे) विद्यमान कर्मचारी वर्गापैकी, मंडळाच्या प्रयोजनार्थ कार्यरत असलेल्या महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट अ व गट ब (प्रशासन शाखा) यातील अधिकारी वर्गाव्यतिरिक्त, शासन निदेश देईल अशा कर्मचारी वर्गाला ती परिषद स्वतःकडे घेईल आणि नोकरीला लावील आणि अशा रीतीने परिषदेने स्वतःकडे घेतलेली आणि नोकरीला लावलेली प्रत्येक व्यक्ती ही, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या विनियमांच्या तरतुदींच्या अधीन असेल :

परंतु, हा अधिनियम अंमलात येण्याच्या लगतपूर्वी, अशा कोणत्याही कर्मचाऱ्याच्या बाबतीत लागू असणाऱ्या सेवाविषयक शर्तीमध्ये त्याचे नुकसान होईल अशा रीतीने कोणताही बदल शासनाच्या पूर्व-मान्यतेखेरीज करण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की अशा कर्मचाऱ्याने शासनाकडे केलेली कोणतीही सेवा ही, राज्य परिषदेकडे केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) च्या मध्ये असलेली कोणतीही गोष्ट, राज्य परिषदेने घेतलेल्या किंवा मंडळाच्या विद्यमान कर्मचाऱ्यांपैकी ज्या कोणत्याही कर्मचाऱ्याने हा अधिनियम अंमलात आणल्याच्या दिवशी किंवा शासनाकडून ठरविण्यात येईल अशा नंतरच्या दिवशी, लेखी नोटीशीद्वारे, आपला राज्य परिषदेचा कर्मचारी न होण्याचा किंवा कर्मचारी म्हणून न राहण्याचा विकल्प कळविला असेल, अशा कर्मचाऱ्याला लागू होणार नाही, आणि त्यानंतर

त्याला शासकीय सेवेतून निवृत्त होण्याची परवानगी असेल व शासनाकडून ठरविण्यात येतील असे, भरपाई, निवृत्ती वेतन, उपदान किंवा तत्सम सर्व अंतिम लाभ मिळण्याचा हक्क राहील (हे अंतिम लाभ जर हा अधिनियम अंमलात आल्यानंतर त्याची शासनाकडील सेवा संपुष्टात आली असती तर, त्याला जे अंतिम लाभ मिळाले असते, त्यापेक्षा कमी अनुकूल असणार नाहीत):

परंतु, तसेच अशा, कर्मचाऱ्याने मंडळाकडे केलेली कोणतीही सेवा ही राज्य परिषदेकडे केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.

(३) या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाच्या संबंधात, नियत दिनांकापूर्वी मंडळाने, केला असेल असा सर्व खर्च, कलम २७ अन्वये, त्या दिनांकाला, शासनाने, राज्य परिषदेला दिलेल्या भांडवली खर्च मानण्यात येईल आणि असा खर्च करून प्राप्त केलेली सर्व मत्ता राज्य परिषदेकडे निहित होईल.

(४) मंडळाची सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता आणि सर्व हक्क आणि कोणत्याही प्रकारचे हितसंबंध आणि विद्यमान अधिकार आणि विशेषाधिकार आणि वर्तमान कार्यक्रम, या राज्य परिषदेकडे हस्तांतरित व निहित होतील व ज्या उद्देशांकरिता आणि प्रयोजनांकरिता राज्य परिषदेची रचना करण्यात आली आहे, त्यासाठी त्यांचा वापर केला जाईल.

(५) कोणत्याही योजनेच्या संबंधात, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता राज्य परिषदेची प्रथमतः रचना होण्यापूर्वी शासनाने किंवा मंडळाने, शासनाशी किंवा मंडळाशी अथवा शासनाकरिता किंवा मंडळातील पत्करलेली सर्व दायित्वे, बंधने, केलेले सर्व करार आणि करण्याचे वचन मिळालेल्या इतर सर्व बाबी व गोष्टी राज्य परिषदेने पत्करल्याचे राज्य परिषदेशी करण्यात आल्याचे किंवा राज्य परिषदेकरिता करण्याचे वचन मिळाल्याचे समजण्यात येईल आणि तदनुसार, शासनाकडून किंवा यथास्थिति, मंडळाकडून किंवा त्याविरुद्ध दाखल करण्यात आलेले किंवा दाखल करण्यात आले असते असे सर्व दावे किंवा कायदेशीर कार्यवाही राज्य परिषदेकडून किंवा राज्य परिषदेविरुद्ध पुढे चालू ठेवण्यात येतील किंवा दाखल करण्यात येईल.

राज्य परिषदेच्या आयुक्ताची नियुक्ती, अधिकार व कर्तव्ये.

२०. (१) राज्य परिषदेसाठी, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ (प्रशासन शाखा) यामधील शिक्षण सह-संचालकाचे पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून एका शिक्षण सह-संचालकाची आयुक्त म्हणून नियुक्ती करील.

(२) आयुक्त राज्य परिषदेद्वारे चालविल्या जाणाऱ्या परीक्षांचा आकृतिबंध, आयोजन आणि त्या परीक्षा घेणे याकरिता संपूर्णपणे जबाबदार असेल.

(३) आयुक्त, राज्य परिषदेच्या परीक्षा समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.

(४) आयुक्तास, राज्य परिषदेच्या इतर सर्व वैधानिक निकायांच्या बैठकीस हजर राहण्याचा हक्क असेल.

(५) आयुक्त हा, राज्य परिषदेच्या अध्यक्षांच्या नियंत्रणास अधीन राहून, राज्य परिषदेचा कार्यकारी अधिकारी असेल.

(६) आयुक्त, विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

राज्य परिषदेचे उप आयुक्त, सहाय्यक आयुक्त आणि मूल्यमापन अधिकारी यांची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये.

२१. (१) राज्य परिषदेमध्ये शासन, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (प्रशासन शाखा) यामधील शिक्षण उप संचालकांच्या संवर्गामधून दोन किंवा अधिक उप आयुक्तांची नेमणूक करील.

(२) राज्य परिषदेमध्ये शासनाने, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-अ (प्रशासन शाखा) यांतील सहाय्यक शिक्षण संचालकांच्या संवर्गामधून नेमलेले सहायक आयुक्त, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (प्रशासन शाखा) यामधून नेमलेले मूल्यमापन अधिकारी आणि अध्यक्षांच्या शिफारशीनुसार शासन ज्यांची संख्या निश्चित करील असे इतर अधिकारी, असतील.

(३) उप आयुक्त, सहायक आयुक्त आणि मूल्यमापन अधिकारी व इतर अधिकारी हे, आयुक्त निदेश देईल अशी कर्तव्ये पार पाडतील आणि अशा अधिकारांचा व प्राधिकाराचा वापर करतील.

२२. (१) राज्य परिषदेस, शासनाच्या मान्यतेने, या अधिनियमाखालील त्यांची कार्ये आणि विभागीय परिषदांची कार्ये सक्षम रीतीने पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी नेमता येतील. परिषदेचे इतर अधिकारी आणि कर्मचारी.

(२) पोट-कलम (१) अन्वये नेमलेले अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण तीन

## परिषदेचे अधिकार व कर्तव्ये

२३. (१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने परिषदेचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :— परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

(अ) शासनाला शैक्षणिक आणि व्यावसायिक परीक्षांशी किंवा तिच्याकडे सोपविलेल्या इतर परीक्षांशी संबंधित धोरणविषयक बाबींवर वेळोवेळी सल्ला देणे;

(ब) अभ्यासक्रम व पाठ्यविषय ठरवण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे घालून देणे, तसेच राज्य परिषद ज्या क्षेत्रात परीक्षा घेते अशा सर्व क्षेत्रांकरिता तपशीलवार पाठ्यविषय तयार करणे;

(क) राज्य परिषदेने ज्या संस्थांमधील अभ्यासक्रमाची आखणी केलेली असेल व तो विहित केलेला असेल अशा संस्थांमध्ये उचित शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याकरिता लागणारा कर्मचारी-वर्ग, इमारती, फर्निचर, साधनसामग्री, लेखनसामग्री व इतर गोष्टी यांच्या संबंधात प्रमाणभूत गरजा विहित करणे;

(ड) सर्व संबंधित पाठ्यक्रमांसाठी, आवश्यक असल्यास, कोणतीही पुस्तके पाठ्यपुस्तके म्हणून विहित करणे किंवा पुस्तके तयार करण्याची व्यवस्था करून ती पाठ्यपुस्तके म्हणून विहित करणे;

(ई) वेगवेगळ्या परीक्षांसाठी प्रवेश देण्यासंबंधीच्या सर्वसाधारण शर्ती विहित करणे आणि उपस्थिती व वर्तणूक यासंबंधीच्या ज्या शर्ती पूर्ण केल्यावर विद्यार्थ्याला परीक्षेसाठी प्रवेश मिळण्याचा आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क प्राप्त होईल त्या शर्ती विनिर्दिष्ट करणे;

(फ) परीक्षा घेणे आणि विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देणे;

(ग) शिष्यवृत्त्या, विद्यावेतने, पदके, बक्षिसे आणि इतर पारितोषिके सुरू करणे व देणे आणि त्यासाठी शर्ती विहित करणे;

(ह) मृत्यूपत्रित देणग्या, देणग्या, दाननिधी, न्यास आणि कोणत्याही मालमत्तेची किंवा तिच्यातील हितसंबंधाची अथवा तिच्यातील हक्कांची इतर हस्तांतरणे, स्वीकारणे;

(आय) वरील खंड (ह) मध्ये उल्लेखिलेली कोणतीही मालमत्ता, हितसंबंध किंवा हक्क धारण करणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे व त्यासंबंधी व्यवहार करणे;

(ज) राज्य परिषदेकडून, घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी किंवा त्या परीक्षांना बसण्याची मान्यता किंवा परवानगी मिळालेल्या संस्था, व्यक्ती यांच्याकडून, घ्यावयाची फी विहित करणे, तिची मागणी करणे आणि ती स्वीकारणे;

(के) परिषदेशी संलग्न असलेल्या संस्थांमधील शैक्षणिक दर्जा कायम राखला जात असल्याची निश्चिती करण्यासाठी, शिक्षण संचालक किंवा त्यांचे कार्यालय किंवा शिक्षण विभागांची इतर कार्यालये यांच्याकडून विशेष अहवाल व माहिती आणि अशा संस्थांकडून कोणतीही माहिती मागविणे;

(ल) राज्य परिषदेचे महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट अ व गट ब (प्रशासन शाखा) यांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त इतर अधिकारी व कर्मचारी यांची तिच्या कार्यालयात व प्रादेशिक परिषदांच्या कार्यालयात नेमणूक करणे;

(म) परिषदेच्या कर्मचारीवर्गाच्या हितासाठी भविष्यनिर्वाह निधी स्थापन करणे;

(न) राज्य परिषदेशी आणि विभागीय परिषदेशी संबंधित वार्षिक वित्तीय विवरणे मान्य करणे व ती माहितीसाठी शासनाकडे अग्रेषित करणे;

(ओ) अभ्यासक्रम, शिक्षण आणि परीक्षा पद्धती यांचे मूल्यमापन करण्याच्या व तीत सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी सांख्यिकी व अन्य संशोधन करणे;

(पी) या अधिनियमाखालील आपली कामे कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा समित्यांची नेमणूक करणे;

(क्यू) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी विनियम करणे;

(रं) राज्य परिषदेने, विभागीय परिषदांनी आणि त्यांच्या समित्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती; तिच्या समित्या आणि केवळ राज्य संस्था आणि तिच्या समित्या यांच्याच संबंधातील कोणतीही इतर बाब, यांच्याशी संबंधित उपविधी तयार करणे;

(स) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि सोपवण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे;

(ट) या अधिनियमांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक अशा सर्व कृती व गोष्टी करणे;

(यू) परिषदेद्वारे घेण्यात येणाऱ्या, एक किंवा त्याहून अधिक परीक्षा देण्यासाठी विद्यार्थी पाठवण्यास इच्छुक असणाऱ्या संस्थांना संलग्नीकरण देणे, मात्र विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा "संलग्नीकरण देण्यासाठीच्या शर्तींचे" संस्थांनी अनुपालन केले पाहिजे.

(२) कोणत्याही प्राधिकाऱ्याने विनंती केल्यास, परिषदेने मान्य केलेल्या अटी व शर्तींनुसार संविदा तत्त्वावर परीक्षा घेण्याचे काम हाती घेणे, परिषदेसाठी वैध मानण्यात येईल.

(३) विभागीय शिक्षण उप संचालक, शिक्षण अधिकारी किंवा शिक्षण निरीक्षक, गट शिक्षण अधिकारी, शासनाचे इतर संबंधित अधिकारी आणि त्यांचे कर्मचारी यांच्या सेवा परीक्षा घेणे व अशा परीक्षांशी संबंधित इतर सहाय्यभूत कामे करणे यासाठी परिषदेस सहाय्य करण्याकरिता उपलब्ध असतील.

परिषदेच्या अध्यक्षांचे अधिकार आणि कर्तव्ये.

२४. (१) हा अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले विनियम आणि उपविधी यांच्या तरतुदींचे निष्ठापूर्वक पालन केले जात आहे याची निश्चिती करणे हे राज्य परिषदेच्या आणि प्रत्येक विभागीय परिषदेच्या अध्यक्षाचे कर्तव्य असेल आणि या प्रयोजनासाठी आवश्यक ते सर्व अधिकार त्यांच्याकडे असतील.

(२) परिषदेच्या व तिच्या वैधानिक समित्यांच्या (परीक्षा समिती वगळून) सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे हे परिषदेच्या अध्यक्षाचे कर्तव्य असेल.

(३) राज्य परिषदेच्या किंवा विभागीय परिषदेच्या अध्यक्षांच्या मते तातडतोब कार्यवाही करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही निकडीच्या प्रसंगी तो त्यास आवश्यक वाटेल अशी कार्यवाही करील आणि आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल परिषदेस तिच्या लगतनंतरच्या बैठकीत सादर करील.

(४) प्रत्येक अध्यक्ष, विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

विभागीय परिषदांचे अधिकार व कर्तव्ये.

२५. या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, विभागीय परिषदेचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे राहतील :—

(अ) मान्यताप्राप्त व संलग्न संस्थांमधील प्रमाण गरजांच्या संदर्भात राज्य परिषदेने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी, तिच्याकडे पाठविण्यात आलेल्या किंवा तिला स्वतःहून वाटणाऱ्या प्रादेशिक महत्त्वाच्या बाबींसंबंधी राज्य परिषदेला सल्ला देणे;

(ब) परीक्षेला प्रवेश देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहित करण्यात येईल अशा फीची मागणी करणे व ती स्वीकारणे;

(क) तिच्या अधिकारितेच्या क्षेत्रात राज्य परिषदेच्या वतीने अंतिम परीक्षा घेणे.

(ड) राज्य परिषद वेळोवेळी देईल अशा सूचनांनुसार तिच्या अधिकारितेच्या क्षेत्रात परीक्षा घेणे, उमेदवारांच्या कामगिरीचे मूल्यांकन आणि निकालांचे संकलन व तो जाहीर करणे याकरिता परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक व इतर आवश्यक कर्मचारीवर्गाची नियुक्ती करणे;

(ई) यासंबंधात राज्य परिषदेने केलेल्या विनियमांनुसार परीक्षांसाठी उमेदवारांना प्रवेश देणे;

(एफ) तिच्याकडून घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी तिच्या अधिकारितेत केंद्रे उघडणे;

(ग) यासंबंधात राज्य परिषदेने दिलेल्या निदेशानुसार, तिने घेतलेल्या परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांचा निकाल जाहीर करणे;

(ह) शिष्यवृत्ती, विद्यावेतन, पदके, पारितोषिके व इतर बक्षिसे देण्याच्या प्रयोजनासाठी गुणवत्तेनुसार उमेदवारांच्या नावांची यादी राज्य परिषदेला पाठविणे;

(आय) राज्य परिषदेने घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार अनुचित बाबींची प्रकरणे हाताळणे;

(जे) परीक्षांना बसणाऱ्या उमेदवारांचे सर्वसाधारणत: मूल्यमापन करणे आणि त्यासंबंधात राज्य परिषदेकडे आवश्यक त्या शिफारशी करणे;

(के) तिच्या अधिकारितेतील संस्थांना विहित पद्धतीने मान्यता देणे आणि ती मान्यता काढून घेणे;

(एल) विद्याविषयक दर्जा कायम राखण्यासाठी कोणत्याही संलग्न व मान्यताप्राप्त संस्थेकडून कोणतीही माहिती मागवणे आणि निकृष्ट विद्याविषयक कामगिरीच्या प्रकरणात किंवा विद्याविषयक कामगिरीमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने राज्य परिषदेकडून निर्देशित करण्यात आल्यावर किंवा स्वत:हून प्रादेशिक शिक्षक उप संचालकाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक कार्य करणाऱ्या व्यक्तीकडून विशेष माहिती किंवा अहवाल मागवणे;

(म) तिच्या समित्यांनी केलेल्या शिफारशींवर अभिप्राय देऊन त्या आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी राज्य परिषदेकडे पाठवणे ;

(न) परीक्षा घेण्यासाठी, तिने मान्यता दिलेल्या संस्थांकडून किंवा शिक्षण विभागाकडून सहकार्याची मागणी करणे आणि अशी कोणतीही संस्था, कोणतेही स्वीकारार्ह किंवा समर्थनीय कारण नसताना सहकार्य करत नसल्यास, तसा आदेश का काढण्यात येऊ नये यासंबंधी कारण दर्शविण्याची अशा संस्थेला वाजवी संधी दिल्यानंतर, तिला दिलेले परिषदेचे किंवा शिक्षण विभागाचे विशेषाधिकार काढून घेणे किंवा काढून घेण्याची व्यवस्था करणे;

(ओ) राज्य परिषद, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्यानुसार अशा अंतिम परीक्षांना पूरक होईल असे पत्रव्यवहाराद्वारे किंवा इतर अनौपचारिक पाठ्यक्रम घेणे;

(पी) राज्य परिषद तिच्याकडे सोपवील अशा अधिकारांचा वापर करणे.

२६. (१) राज्य परिषदेने कोणताही सल्ला दिलेला असल्यास तो सल्ला विचारात घेतल्यानंतर, शासनाला कलम २३, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसंबंधात त्यास आवश्यक वाटतील असे निदेश परिषदेला किंवा प्रादेशिक परिषदेला देण्याचा अधिकार असेल. संबंधित परिषद अशा निदेशांचे अनुपालन करील. निदेश देण्याचे शासनाचे अधिकार.

(२) तसेच शासनास, राज्य परिषदेने किंवा विभागीय परिषदेने चालवलेल्या किंवा केलेल्या किंवा ती चालवत असलेल्या किंवा करीत असलेल्या किंवा चालवण्याचा किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही गोष्टींसंबंधात सूचना देण्याचा आणि त्या बाबतीतील शासनाची मते संबंधित परिषदेला कळविण्याचा अधिकार असेल.

(३) संबंधित परिषद, शासनाची मते पोट-कलम (२) अन्वये कळविण्यात आल्यानंतर त्यासंबंधात जी कोणतीही कार्यवाही करण्याचे तिने योजिले असेल, किंवा केलेली असेल त्याबद्दल शासनाला कळवील आणि अशी समुचित कार्यवाही करण्यात जर तिने कसूर केली असेल तर त्याबाबत स्पष्टीकरण देईल.

(४) जर अशा परिषदेने शासनाचे समाधान होईल अशा रीतीने वाजवी अवधीत कार्यवाही केली नाही तर, शासन परिषदेने केलेले अभिवेदन किंवा दिलेले स्पष्टीकरण विचारात घेतल्यानंतर, निदेश देऊ शकेल आणि परिषदेला अशा निदेशांचे अनुपालन करावे लागेल.

(५) शासनाच्या मते तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक असेल अशा निकडीच्या वेळी शासनास परिषदेशी आधी विचारविनिमय न करता त्यास आवश्यक वाटेल अशी या अधिनियमाशी सुसंगत कार्यवाही करता येईल, आणि शासन, केलेल्या कार्यवाहीबाबत परिषदेस तावडतोब कळवील.

(६) परिषदेचा कोणताही ठराव, आदेश किंवा परिषदेने करण्याचा आदेश दिलेली किंवा आदेश दिल्याचे अभिप्रेत असलेली कृती ही, परिषदेस या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या पलीकडची आहे असे शासनाचे मत होईल तर, शासन लेखी आदेशाद्वारे आणि कारणे विनिर्दिष्ट करून असा ठराव किंवा आदेश याची अंमलबजावणी स्थगित करू शकेल आणि अशी कृती करण्यास प्रतिबंध करू शकेल.

## प्रकरण चार

### निधी, वित्त व्यवस्था, लेखे व लेखा परीक्षा

राज्य परिषदेचा निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक.

२७. (१) राज्य परिषदेचा स्वत:चा असा एक निधी असेल आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(अ) परिषदेने बसविलेली व वसूल केलेली फी, स्वामित्वधन व आकार– शास्तींसह;

(ब) शासनाने कोणतीही अनुदाने, अभिहस्तांकित रकमा, अंशदान आणि कर्जे दिली असल्यास ती;

(क) कोणत्याही मृत्युपत्रित देणग्या, देणग्या व दाननिधी किंवा इतर अंशदाने असल्यास, ती;

(ड) जिच्याकडे निहित असलेल्या कोणत्याही कर्जरोख्यांवरील व्याज आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न;

(ई) जिच्याकडे निहित असलेल्या मालमत्तेमधून मिळणारे सर्व भाडे व नफा;

(फ) राज्य परिषदेस किंवा तिच्यावतीने मिळालेला इतर पैसा.

(२) राज्य परिषदेला, तिच्या निधीपैकी विहित करण्यात येईल अशी रक्कम, भारतीय स्टेट बँकेकडे किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ च्या कलम २२ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेला परवाना धारण करणाऱ्या, भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ मध्ये केलेल्या व्याख्ये- प्रमाणे असलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेकडे किंवा शासनाने यासंबंधात मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही बँकेकडे, चालू किंवा ठेव खात्यात ठेवता येईल आणि उक्त रकमेपेक्षा अधिक असलेला कोणताही पैसा राज्य परिषद मान्यता देईल अशा रीतीने गुंतवण्यात येईल.

१९४९ चा १०.
१९३४ चा २.

(३) परिषद यासंबंधात तयार केलेल्या विनियमाद्वारे प्राधिकृत करील असे परिषदेचे अधिकारी अशा लेख्याचे व्यवहार करतील.

२८. शासनाने राज्य परिषदेवर आणि विभागीय परिषदांवर पदस्थापित केलेला अध्यक्ष आणि इतर अधिकारी यांचे वेतन, निवृत्तिवेतन, रजा आणि इतर भत्ते याबद्दल शासन निर्धारित करील अशी रक्कम राज्य परिषद तिच्या निधीतून प्रत्येक वर्षी शासनाला देईल.

अध्यक्ष, आयुक्त, उप आयुक्त, सहायक आयुक्त आणि मूल्यमापन अधिकारी व इतर अधिकारी यांचे वेतन, निवृत्तिवेतन इत्यादींवर होणारा खर्च राज्य परिषदेने निधीतून देणे.

२९. या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, राज्य परिषदेच्या निधीचा वापर या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित आकार व खर्च देण्यासाठी आणि राज्य परिषदेला आणि या अधिनियमाखाली स्थापन करण्यात आलेल्या विभागीय परिषदेला ज्या इतर कोणत्याही प्रयोजनासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अधिकार प्रदान करण्यात आले असतील किंवा कर्तव्ये सोपवण्यात आली असतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठीच केवळ करण्यात येईल.

निधीचा सर्वसाधारण वापर.

३०. राज्य परिषदेने या बाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या, राज्य परिषदेकडे किंवा विभागीय परिषदेकडे सेवेत असलेल्या अधिकाऱ्याने सही केलेला धनादेश किंवा पतपत्र यांवर असेल त्याखेरीज बँक, इतर प्रकारे राज्य परिषदेच्या निधीमधून कोणतीही रक्कम देणार नाही.

निधीतून रक्कम काढण्याची रीत.

३१. विभागीय परिषदेच्या अधिकारितेतील, तिला नेमून देण्यात आलेल्या परीक्षा घेण्यासाठी राज्य परिषदेने विभागीय परिषदांवर लादलेली कर्तव्ये व कामे पार पाडणे त्यांना शक्य व्हावे म्हणून राज्य परिषद, ती निर्धारित करील अशा रकमा वेळोवेळी प्रत्येक विभागीय परिषदेला देईल.

प्रादेशिक परिषदेला नियत वाटप.

३२. (१) राज्य परिषद, विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी आणि अशा रीतीने पुढील वित्तीय वर्षाचे त्या परिषदेचे उत्पन्न व खर्च यांचा अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील आणि त्यामध्ये विभागीय परिषदांचा पुढील वित्तीय वर्षाचा जमाखर्च अंतर्भूत करील.

वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

(२) राज्य परिषद, तिने तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजावर पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा त्यानंतर, विचार करील व तिने मान्य केलेल्या स्वरूपात ते राज्य शासनास त्याच्या माहितीसाठी, सादर करील. राज्य शासनास, अर्थसंकल्पीय अंदाजाच्या संदर्भात त्यास योग्य वाटतील असे आदेश काढता येतील व ते राज्य परिषदेला कळवता येतील. राज्य परिषद असे आदेश अंमलात आणील.

३३. (१) राज्य परिषद विहित अशा नमुन्यात आणि अशा रीतीने लेखे ठेवील.

(२) शासनाच्या पूर्वमान्यतेने राज्य परिषदेने नियुक्त केलेला लेखा परीक्षक राज्य परिषदेच्या आणि विभागीय परिषदेच्या लेख्यांची परीक्षा करील.

वार्षिक लेखे व लेखा परीक्षा.

(३) शासनाला आवश्यक वाटल्यास शासनाला परिषदेच्या लेख्यांची परीक्षा करण्यासाठी विशेष लेखा परीक्षकाची नियुक्ती करता येईल.

(४) यथास्थिति, लेखा परीक्षक किंवा विशेष लेखा परीक्षक त्याचा अहवाल राज्य परिषदेकडे सादर करील आणि त्याची प्रत शासनाकडे पाठवील.

(५) पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये कोणतीही लेखा परीक्षा करण्यात आल्यास तिचा खर्च राज्य परिषद करील.

तपासणी व चौकशी.

३४. (१) राज्य शासनास, ते निदेश देईल अशा व्यक्तीमार्फत किंवा व्यक्तींमार्फत राज्य परिषदेने मान्यता दिलेल्या किंवा राज्य परिषदेशी किंवा प्रादेशिक परिषदेशी संलग्न असलेल्या कोणत्याही संस्थेच्या इमारती, वसतिगृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि साधनसामुग्री यांची तपासणी करण्याची व्यवस्था करण्याचा ; आणि कोणत्याही परिषदेशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबी-संबंधात तशाच रीतीने चौकशी करण्याची व्यवस्था करण्याचा हक्क असेल. प्रत्येक प्रकरणी, शासन, तपासणी किंवा चौकशी करण्याची व्यवस्था करण्याच्या आपल्या इराद्याची संबंधित मंडळाला रीतसर सूचना देईल आणि परिषदेला एक प्रतिनिधी नेमण्याचा हक्क असेल व अशा प्रतिनिधीस अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या वेळी हजर राहण्याचा आणि बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(२) शासन अशा तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाच्या संबंधात आपले म्हणणे परिषदेला कळवील आणि परिषदेचे त्यावरील मत अजमाविल्यानंतर शासन परिषदेला करावयाच्या कार्यवाही-बद्दल सल्ला देऊ शकेल आणि अशी कार्यवाही करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करू शकेल.

(३) तपासणीच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षाबाबत परिषदेने कोणतीही कार्यवाही केलेली असेल किंवा करावयाचे ठरविले असेल तर त्या कार्यवाहीसंबंधी ती राज्य शासनास कळवील. अशी माहिती, परिषदेच्या त्यावरील मतासह राज्य शासन निदेश देईल अशा वेळेच्या आत सादर करण्यात येईल.

(४) निश्चित केलेल्या वेळेच्या आत, परिषदेने शासनाचे समाधान होईल अशी कार्यवाही केली नसेल त्या बाबतीत, शासनास परिषदेने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असे निदेश काढता येतील आणि परिषद अशा निदेशांचे अनुपालन करील.

परिषदेने पुरवावयाची माहिती, विवरणे, इत्यादी.

३५. (१) राज्य परिषद आणि प्रत्येक विभागीय परिषद, शासन फर्माविल असे अहवाल, विवरणे व विवरणपत्रे आणि तिच्या कामाशी संबंधित कोणत्याही बाबीसंबंधात शासन मागवील अशी आणखी माहिती शासनास पुरवील.

(२) असा कोणताही अहवाल, विवरण किंवा विवरणपत्रे किंवा पुरवलेली माहिती विचारात घेतल्यानंतर, राज्य शासन, या अधिनियमाशी सुसंगत असणारे, आवश्यक असे निदेश देऊ शकेल आणि यथास्थिति, राज्य परिषद किंवा विभागीय परिषद अशा निदेशांचे अनुपालन करील.

## प्रकरण पाच

## संकीर्ण तरतुदी

परिषदेकडे किंवा समितीकडे सोपविलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत.

३६. या अधिनियमाद्वारे राज्य परिषदेला प्रदान करण्यात आलेले जे अधिकार त्या परिषदेने विनियमांद्वारे विभागीय परिषदेकडे किंवा समितीकडे सोपवले असतील त्या अधिकारांचा परिषदेने वापर करण्यासंबंधीच्या सर्व बाबी त्या समितीकडे हस्तांतरित होतील आणि अशा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यापूर्वी, राज्य परिषद, संबंधित बाबीसंबंधातील उक्त समितीचे अहवाल स्वीकारील व ते विचारात घेईल.

३७. (१) राज्य परिषदेस, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, शासनाच्या पूर्वमंजुरीने विनियम करता येतील. विनियम करण्याचे राज्य परिषदेचे अधिकार.

(२) विशेषकरून आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा विनियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(अ) कलम १८ खाली नेमण्यात आलेल्या समित्यांची रचना, अधिकार व कर्तव्ये;

(ब) परीक्षांचे विषय व अभ्यासक्रम;

(क) परीक्षेसाठी उमेदवारांना प्रवेश देण्याबाबतच्या सर्वसाधारण शर्ती आणि उमेदवाराला फी, उपस्थिती आणि वर्तणूक यासंबंधीच्या ज्या विशिष्ट शर्ती पूर्ण केल्यानंतर अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळण्याचा आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क असेल त्या शर्ती ;

(ड) कोणत्याही विषयात व एकूण परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी तसेच कोणत्याही विषयात सूट, विशेष योग्यता व प्रावीण्य मिळविण्यासाठी आवश्यक असलेले गुण ;

(ई) परीक्षेसाठी प्रवेश फी व त्या परीक्षेच्या संबंधातील इतर बाबींबाबत द्यावयाची इतर फी व आकार;

(फ) परीक्षा घेण्याची व निकाल प्रसिद्ध करण्याची व्यवस्था;

(ग) परीक्षक, नियामक, मुख्य नियामक, प्राश्निक, अनुवादक, केंद्र परीक्षाचालक इत्यादींची नेमणूक, आणि परीक्षांसंबंधातील त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांचे पारिश्रमिक;

(ह) परीक्षक, नियामक, मुख्य नियामक, प्राश्निक, अनुवादक, केंद्र परीक्षाचालक इत्यादींच्या अर्हता व निरर्हता;

(आय) प्रमाणपत्रे देणे;

(जे) राज्य परिषदेच्या स्वतःच्या कार्यालयात आणि प्रादेशिक परिषदेच्या कार्यालयात अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करणे आणि त्यांच्या सेवेच्या शर्ती ठरवणे;

(के) खंड (जे) मध्ये निर्देशिलेल्या परिषदेच्या उक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी भविष्यनिर्वाह निधी स्थापन करणे;

(ल) परिषदेच्या वित्तीय साधनांचे सर्व प्रकारे नियंत्रण, प्रशासन, अभिरक्षा व व्यवस्थापन ;

(म) राज्य परिषद ज्या तारखेपूर्वी व ज्या रीतीने तिचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील ती तारीख व रीत ;

(न) परिषदेच्या सदस्यांना व त्यांनी नेमलेल्या समिती सदस्यांना घेता येतील असे पूरक भत्ते;

(ओ) या अधिनियमाखाली विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

३८. (१) कलम ३७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पहिले विनियम हे राज्य शासन तयार करील आणि उक्त कलमान्वये नवीन विनियम रीतसर तयार करण्यात येईतोपर्यंत आणि मंजूर होईपर्यंत ते अंमलात राहतील. पहिले विनियम.

(२) कलम ३७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणतेही नवीन विनियम करणे इष्ट आहे किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या किंवा कलम ३७ अन्वये राज्य परिषदेने केलेल्या कोणत्याही विनियमांमध्ये, पूर्णतः किंवा अंशतः फेरबदल करणे किंवा तो निरसित करणे इष्ट आहे असे शासनास कोणत्याही वेळी वाटले तर शासनास राज्य परिषदेशी विचार-विनिमय केल्यानंतर आणि राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे विनियम करता येतील किंवा अशा कोणत्याही विनियमांत संपूर्णपणे, किंवा अंशतः फेरबदल करता येतील किंवा ते संपूर्णपणे किंवा अंशतः निरसित करता येतील. याप्रमाणे तयार केलेले, फेरबदल केलेले किंवा निरसित केलेले विनियम, शासन अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा तारखेपासून किंवा अशी कोणतीही तारीख विनिर्दिष्ट केलेली नसेल तर अशा उक्त अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून, अशा तारखेपूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीत असेल ते खेरीजकरून, इतर बाबतीत अंमलात येतील.

उपविधी करण्याचा राज्य परिषदेचा अधिकार- ३९. राज्य परिषदेस पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात तरतूद करण्यासाठी या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या विनियमांशी सुसंगत असे उप-विधी करता येतील :—

(अ) राज्य परिषदेच्या व विभागीय परिषदेच्या आणि त्यांच्यापैकी कोणीही नेमलेल्या समितीच्या सभांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती व अशा सभांमध्ये गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक सदस्य संख्या;

(ब) या अधिनियमाद्वारे किंवा या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांद्वारे ज्याबाबत तरतूद केलेली नसेल अशी, केवळ परिषदेशी आणि तिच्या समित्यांशी संबंधित इतर कोणतीही बाब. १८

शंका उपस्थित होईल त्या बाबतीत अर्थ उकल. ४०. हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही विनियम किंवा उप-विधी यांच्या कोणत्याही तरतुदींचा अर्थ लावण्याच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, ती बाब, निर्णयासाठी शासनाकडे निर्देशित करता येईल, आणि परिषदेच्या सदस्यांपैकी तीन पेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी तशी मागणी केल्यास, ती बाब याप्रमाणे निर्णयासाठी शासनाकडे निर्देशित करण्यात येईल. शासनाचा निर्णय अंतिम असेल.

व्यावृत्ती. ४१. (१) नियत दिनांकाच्या लगतपूर्वी मंडळाने स्वीकारलेली किंवा त्याला मिळालेली आणि त्याने धारण केलेली धर्मदाने राज्य परिषदेने या अधिनियमाखाली स्वीकारली असल्याचे किंवा ती तिला मिळाली असल्याचे किंवा तिने धारण केली असल्याचे मानण्यात येईल, आणि ज्या शर्तींवर अशी धर्मदाने स्वीकारण्यात आली असतील किंवा मिळाली असतील किंवा धारण केली असतील त्या सर्व शर्ती या अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्या तरीही या अधिनियमाखाली विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल.

(२) मंडळाच्या नावे दिलेली कोणतीही मृत्युपत्रित देणगी, भेट, असलेल्या अटी किंवा न्यास याचा ज्यात समावेश आहे, असे नियत दिनांकापूर्वी करण्यात आलेले कोणतेही मृत्युपत्र, विलेख किंवा इतर दस्तऐवज याचा अर्थ, नियत दिनांकास व तेव्हापासून असा लावण्यात येईल की जणू काही त्यामध्ये मंडळाऐवजी राज्य परिषदेचे नाव दाखल करण्यात आलेले आहे.

(३) नियत दिनांकाच्या लगतपूर्वी मान्यता देण्यात आलेल्या व मंडळाचे विशेषाधिकार देण्यात आलेल्या सर्व संस्थांना या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये अशी मान्यता किंवा विशेषाधिकार काढून घेण्यात येतील, निर्बंधित केले जातील किंवा त्यात फेरबदल केले जातील त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत या अधिनियमान्वये मान्यता मिळालेली असल्याचे व उक्त अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या तत्सम परिषदेचे विशेषाधिकार मिळालेले असल्याचे मानण्यात येईल.

(४) नियत दिनांकापूर्वी पत्करण्यात आलेली आणि ब्यूरोच्या नावे कायदेशीरपणे अस्तित्वात असलेली सर्व ऋणे, दायित्वे व आबंधने यांची फेड व पूर्तता राज्य परिषद करील.

(५) कोणत्याही अधिनियमितीमध्ये किंवा कोणत्याही अधिनियमितीअन्वये काढण्यात आलेल्या इतर संलेखांमध्ये, मंडळासंबंधी असलेले सर्व उल्लेख हे राज्य परिषदेबाबतचे उल्लेख आहेत असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.

(६) मंडळाची प्रत्येक समिती चालू ठेवण्यात येईल, परंतु, अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या विनियमांच्या तरतुदींना अनुसरून, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, व्यवहार्य असेल तितक्या लवकर तिची पुनर्रचना करण्यात येईल.

(७) मंडळासाठी वैध रीतीने केलेली आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेली परीक्षकांची, नियमकांची, प्राश्निकांची, अनुवादकांची, केंद्र संचालकांची व परीक्षांशी संबंधित किंवा आनुषंगिक कामासाठी इतर कर्मचारीवर्गाची केलेली नियुक्ती परिषदेसाठी केलेली आहे असे मानले जाईल आणि असे कार्यचालक या अधिनियमाखाली राज्य परिषदेसाठी नवीन नियुक्त्या होईपर्यंत पद धारण करतील व त्यांची कर्तव्ये व कामे पार पाडतील.

(८) मंडळाने काढलेल्या किंवा जारी केलेल्या सर्व सूचना परिपत्रके व आदेश या अधिनियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर अंमलात असण्याचे चालू राहील आणि ते या अधिनियमाखाली काढलेले किंवा जारी केलेले असल्याचे मानले जाईल.

४२. या अधिनियमाच्या किंवा कोणतेही विनियम किंवा उप-विधी यांच्या अनुषंगाने सद्भावना-पूर्वक केलेल्या अथवा करण्याचे अभिप्रेत किंवा उद्देशित असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल शासन, परिषद किंवा शासनाचे किंवा परिषदेचे सदस्य किंवा कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला अथवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्भावना-पूर्वक केलेल्या कार्यवाहीचे संरक्षण.

१८६० चा ४५. ४३. या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींनुसार, ज्यावेळी परिषदेचा अध्यक्ष, परिषदेचे सर्व सभासद, अधिकारी आणि कर्मचारी कृती करीत असतील किंवा कृती करीत असल्याचे अभिप्रेत असेल त्यावेळी भारतीय दंड संहितेच्या कलम २१ मधील अर्थानुसार, त्यांना लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. परिषदेचा अध्यक्ष, सभासद, अधिकारी आणि कर्मचारी लोकसेवक असणे.

४४. ह्या अधिनियमाच्या तरतुदी लागू करण्यामध्ये कोणतीही अडचण उद्भवली तर, शासनाला आदेशाद्वारे प्रसंगानुसार परंतु हा अधिनियम अंमलात आल्यापासून दोन वर्षांपेक्षा उशिराच्या नसलेल्या कालावधीत ती अडचण दूर करण्याकरिता त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी आणि या अधिनियमाच्या उद्दिष्टांशी व प्रयोजनांशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल. अडचणी दूर करण्याचे अधिकार.